**पोलीस अधिक्षक कार्यालय, वाशिम**
काटा रोड, सिव्हील लाईन, वाशिम, ता.जि.वाशिम.
कार्यालय दूरध्वनी क्र. – ०७२५२-२३४८२४
ई-मेल :- sp.washim@mahapolice.gov.in
वेबसाईट :- www.washimpolice.gov.in

---

**प्रेस नोट** दि.०३.०९.२०२२

**वाशिम पोलीस दलाचे ट्विटर अकाऊंट 'व्हेरीफाईड' ; सोशल मिडियाच्या माध्यमातून जोपासला जातोय 'पोलीस-जनता' सलोखा.**

***

हल्लीच्या युगात फेसबुक, ट्विटर, व्हाट्सॲप या 'सोशल मिडिया' माध्यमांचा वापर जोमात केला जात आहे. सतत अद्ययावत होत असलेल्या तंत्रज्ञानामुळे माणसा-माणसातील अंतर डिजिटली कमी झाले आहे. त्यामुळे विचारांची, संदेशांची व व्यवहारांची देवाणघेवाणही ऑनलाईन झाली आहे. यामध्ये आपले वाशिम जिल्हा पोलीस दलही ऑनलाईन सोशल मिडीयाच्या माध्यमातून नागरिकांशी संवाद साधत 'पोलीस-जनता' सलोखा जोपासत आहे. नुकतेच वाशिम जिल्हा पोलीस दलाच्या ट्विटर अकाऊंटला 'व्हेरीफाईड ब्लू टिक' प्राप्त झाला आहे.

वाशिम पोलीस दलाच्या अधिकृत फेसबुक पेज, ट्विटर अकाऊंट, संकेतस्थळ व युट्युब चॅनेल या सोशल मिडीयाच्या माध्यमातून प्रभावी पोलिसिंग राबविली जात आहे. वाशिम पोलीस दलातर्फे कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी व समाजात शांतता प्रस्थापित करण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध जनकल्याणकारी उपक्रमांची माहिती जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी व जनतेशी संवाद साधत त्यांच्या अडचणी जाणून घेण्यासाठी फेसबुक पेज व ट्विटरचा वापर प्रभावीपणे केला जात आहे. नागरिक फेसबुक पेज व ट्विटर पोस्टवर कमेंट करून किंवा संदेश पाठवून त्यांच्या समस्या मांडत आहेत व त्या समस्या सोडविण्याचा प्रयत्न वाशिम जिल्हा पोलीस दल सातत्याने करत आहे. वाशिम जिल्हा पोलीस दलाचे सद्यस्थितीत एकूण १९ ट्विटर अकाऊंट असून जवळपास १२ हजार फॉलोअर्स आहेत तर फेसबुकवर एकूण १७ खाती असून जवळपास ०९ हजार फॉलोअर्स आहेत. सदर सोशल मिडिया खात्यांच्या माध्यमातून नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून सातत्याने निगराणी केली जात आहे. गेल्या वर्षभरात फेसबुक व ट्विटर वापरकर्त्यां फॉलोअर्सची संख्या जवळपास ४५% नि वाढली आहे. वाशिम पोलीस दलातर्फे सोशल मिडीयाचा वापर करून नागरिकांशी थेट संवाद, एखाद्या गुन्ह्याची माहिती, जनजागृतीपर उपक्रम व कार्यक्रम, नागरिकांची मते व नागरिकांना प्रशासनात अपेक्षित असलेल्या सुधारणा याबाबत माहिती घेतली जाते.

सदर सोशल मिडिया खात्यांची हाताळणी पोलीस अधीक्षक श्री.बच्चन सिंह (IPS), अपर पोलीस अधीक्षक श्री.गोरख भामरे (IPS) यांच्या मार्गदर्शनाखाली पोना.११२९, अमोल काळमुंदळे, पोकॉ.३५, विठ्ठल सुर्वे हे करत आहेत. नागरिकांनी सोशल मिडीयाचा वापर चांगल्या कामांसाठी करावा व काही माहिती पुरवायची असल्यास किंवा काही अडचण असल्यास वाशिम पोलीस दलाचे अधिकृत ट्विटर अकाऊंट @SP_Washim व फेसबुक पेज 'वाशिम पोलीस' यावर कळवावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

**(जनसंपर्क अधिकारी)**
पोलीस अधीक्षक कार्यालय, वाशिम.